# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
## Maharashtra Industrial Development Corporation
**(A Government of Maharashtra Undertaking)**

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई 400 093.
Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093.
☎:022-2687 0027/52/54/73

प्रिन्सिपल कार्यालय : 4,4 (ए) 12 वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-1, कफ परेड, मुंबई 400 005.
Principle Office : 4,4 (A), 12th Floor, World Trad Centre-1, Cuffe Parade, Mumbai-400 005.
☎: +91-22-22151451/52/53

www.midcindia.org


जा.क्र. मऔविम/म.व्य.(भूमी)/A97433 दिनांक: 16/05/23

## परिपत्रक

**विषय: निवासी भूखंड वाटप प्रक्रियेत सुधारणा करणेबाबत.**
**Group Housing.**

महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार औद्योगिक क्षेत्रामधील कंपन्यांच्या कामगारांच्या निवासी प्रयोजनाकरिता निविदा पध्दतीने / प्राधान्याने कंपनीच्या नांवे निवासी भूखंड वाटप करण्यात येते. महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील एकापेक्षा अधिक कंपन्या त्यांचे कामगारांकरिता एकत्रितपणे कंपन्यांच्या नांवे (Group of Companies) निवासी भूखंड वाटपाबाबत विनंती महामंडळाकडे प्राप्त होत आहेत. तथापि, एकापेक्षा अधिक कंपन्यांच्या नांवे त्यांचे कामगारांच्या निवासी प्रयोजनाकरिता निवासी भूखंड वाटपाबाबत सद्य:स्थितीत धोरण नसल्याने सदर धोरणामध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याने सदरहू प्रस्ताव महामंडळाच्या सदस्य मंडळाच्या दिनांक २३.०३.२०२३ रोजी झालेल्या ३९५ व्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सदस्य मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होवून ठराव क्रमांक ६५६३ पारीत करण्यात आला असुन महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील एकापेक्षा अधिक कंपन्यांना त्यांचे कामगारांकरिता एकत्रितपणे कंपन्यांच्या नांवे (Group of Companies) निवासी भूखंड वाटपाबाबत पुढीलप्रमाणे कार्यप्रणाली निश्चित करण्यात येत आहे.

महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील एकापेक्षा अधिक कंपन्यांनी एकत्र येऊन Group of Companies स्थापन करुन त्यांच्या कामगारांच्या निवासी प्रयोजनाकरिता निवासी भूखंड वाटपाबाबत विनंती केल्यास अशा Group of Companies यांना खालील अटी व शर्तींवर निवासी भूखंड वाटप करण्यात यावा.

(१) सदर Group of Companies मधील कंपन्यांनी त्यांचे कर्मचाऱ्यांकरिता निवासी प्रयोजनासाठी निवासी भूखंड मागणी अर्ज सादर केल्यानंतर संबंधीत प्रादेशिक अधिकारी यांनी महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार (परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/मव्य(भूमी)/ए-९७७५५, दिनांक २१.०३.२०२२) कंपन्यांची त्यांच्या



Scanned with OKEN Scanner

प्रकल्पातील भांडवली गुंतवणूक, वार्षिक उलाढाल, कामगार संख्या व त्यांची वर्गवारी तसेच इतर निकषांसंदर्भात तपासणी करुन सर्व कंपन्या महामंडळाचे विहीत निकष पूर्ण करीत असल्याबाबत खातरजमा करावी.

(२) अशा पात्र Group of Companies यांनी त्यांची सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन ती नोंदणीकृत करणे आवश्यक आहे, ज्यामध्ये ग्रुपमधील सर्व कंपन्या सदर गृहनिर्माण संस्थेच्या सभासद असतील.

(३) संबंधीत प्रादेशिक कार्यालयाने भूखंड वाटपासाठी सक्षम प्राधिकारी यांची मंजुरी घेऊन सदर नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांना महामंडळाच्या प्रचलित धोरणातील सर्व अटी व शर्तीनुसार कार्यवाही करावी.

(४) अशा Group of Companies यांनी स्थापन केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना वाटप केलेल्या भूखंडाच्या विकासाकरिता विहीत विकास कालावधी ३ वर्षांचा राहील.

(५) वरील सुधारणेव्यतिरीक्त महामंडळाच्या विविध औद्योगिक क्षेत्रामधील कंपन्यांच्या कामगारांच्या निवासी प्रयोजनाकरिता निवासी भूखंड वाटपासंदर्भात प्रचलित धोरणातील इतर सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

सदरहु परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**( अनिल भंडारी )**
सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)
मऔविम, मुंबई

प्रत:

(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
(२) अतिरीक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे / नांदेड / नागपूर
(३) महाव्यवस्थापक (भूमी / विधी / भूसंपादन / मा व तं / जनसंपर्क / म.ब.वि. / डीएमआयसी / पणन)
(४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम,
(५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम,
(६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम,
(७) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर.
(८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
(९) सर्व औद्योगिक संघटना
(१०) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ / जागतिक व्यापार केंद्र, मुंबई.



Scanned with OKEN Scanner